पुण्यनगरी ■ सोमवार, १८ फेब्रुवारी २०१९ ■ कोल्हापूर

# शेतकरी आत्महत्येस राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणा जबाबद

## खासदार राजू शेट्टी : कमला कॉलेजमध्ये 'आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे' आयोजन

कोल्हापूर / प्रतिनिधी :

राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणा हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्तेस जबाबदार आहे. आजही याची भीषणता वाढत असतना शासनकर्ते तिकडे दुर्लक्ष करत आहेत. असा आरोप खासदार राजू शेट्टी यांनी केला. येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयामध्ये शनिवारी आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. एस. एन. पवार होते.

खासदार शेट्टी पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या आत्महत्तेस राजकर्ते जबाबदार आहेत. शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या घटत चालली आहे. पर्यायाने देशाच्या एकूल संपतीमधील शेतकऱ्यांचा हिस्सा देखील घटला आहे. जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत आपला शेतकरी आजही टिकाव धरू शकत नाही. आरोग्यशिक्षण आणि राहणीमान याकडे दुर्लक्ष होत आहे. विविध योजनानसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी कवडी मोल किंमतीला कडून घेतल्या जात आहेत, शेतीवर हवामान बदलाच परिणाम होऊन शेतकऱ्यांना दुष्काळ, वादळ या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांचे शोषण होऊ नसे यासाठीच चळवळी नेटाने उभारल्या पाहिजेत. असेही खासदार शेट्टी यांनी सांगितले.



कोल्हापूर : कमला कॉलेजच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना खासदार राजू शेट्टी. सोबत कार्यकारी अध्यक्ष क्रांतिकुमार पाटील, गेल ऑम्वेट, डॉ. नीता धुमाळ, डॉ. सुजय पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर व इतर. (छाया : पांडुरंग पाटील)

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, इतिहासामधूनच भविष्याची निर्मिती होते. पारंपारिक शेती मागे पडून ग्रीनहाउस ही संकल्पना उदयास येत आहे. शासनाने विंडमिल, सोलर प्रकल्प शेतकऱ्यांना नाममात्र किंमतीत दिले पाहिजेत. उर्जेच्या बाबतीत आपण स्वा पाहिजे. शेतकऱ्यांच्या हि केला पाहिजे. पूर्वी स्त्री बी बियाणांची पद्धतर्श करत होत्या.ते आता आहे. जलनायक संप म्हणाले, पाण्याचा प्रश्न आहे. शेती आणि मा पाण्यावरच अवलंबून

यावेळी ताराराणी कार्यकारी अध्यक्ष पाटील सचिव प्राज गेल ऑम्वेट, संयोजक धुमाळ आणि डॉ. सु प्रभारी प्राचार्या डॉ तेज यांच्यासह मान्यवर उ